क्र.उसं/औवशा/भूखंड हस्तांतरण/सुलभिकरण/१३/बी-१६४२८
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २५.१०.२०१३

प्रति,
उद्योग सह संचालक (मुंप्रावि),
औद्योगिक रसायन प्रयोग शाळा,
व्ही.एन.पुरव मार्ग, टाटानगर
चुनाभट्टी, मुंबई.

विषय : सहकारी औद्योगिक वसाहतींना शासनामार्फत दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टा कराराने दिलेल्या जमिनीमधील भूखंड हस्तांतरण प्रकरणी अधिमूल्य घेणेबाबत...

संदर्भ : कार्यालयीन परिपत्रक क्र. उसं/औवशा/भूखंड हस्तांतरण/सुलभीकरण/२०१३/ बी-१४७०८, दि. १७.९.१३

**महोदय,**

आपले लक्ष मुख्यालयाचे वरील विषयाबाबतचे परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. उपरोक्त परिपत्रकातील मुद्दा क्र. ३ मध्ये जेथे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र असे नमुद केले आहे, तेथे उद्योग उप संचालक (मुंप्रावि) यांनी कार्यवाही करावयाची आहे. (अधिमुल्य निश्चिती, चलन प्रमाणित करणे व अनुज्ञेय प्रक्रियेसाठी भुखंड वापर) तसेच मुद्दा क्र. ४ वरील ''सदर सभेत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी उपस्थित राहून त्यांचे मत ठरावात नोंदविणे बंधनकारक राहील, याकरिता संस्थेने हस्तांतरणाबाबत आयोजित संचालक मंडळ सभेची नोटीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना विषयसूचीसह संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार द्यावी. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे मत प्रतिकूल असल्यास असा प्रस्ताव उद्योग सह संचालक, विभागीय कार्यालयाकडे मंजूरीस्तव पाठवावा'' अशी शब्दरचना आहे.

उद्योग सह. संचालक (मुंप्रावि) हे मुंबई जिल्हा व उपनगर जिल्ह्याचे सह संचालक असून महाव्यवस्थापक हे पद अस्तित्वात नसल्याने मुंबईच्या बाबतीत तेथे उद्योग उप संचालक, मुं.प्रा.वि. यांनी कार्यवाही

करावयाची असून त्यांचे मत भूखंड हस्तांतरणाबाबत प्रतिकुल असल्यास त्यांनी तसा प्रस्ताव उद्योग सह. संचालक (मुंप्रावि) यांना पाठवावा व अनुषंगिक कार्यवाही संदर्भिय परिपत्रकास अनुसरून करण्यात यावी.

सही/-
**सहनिबंधक सह.संस्था (सऔव)**

**प्रत माहितीसाठी :**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सहकारी औद्योगिक वसाहत फेडरेशन लि., सांगली.
द्वारा वसंतदादा सहकारी औद्योगिक वसाहत,
सांगली-४१६ ४१६.